**जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा भरती सन -२०१९**

**प्रतिक्षायादीतील उमेदवारांबाबत जाहीर प्रसिध्दीपत्रक**

**दिनांक १४/०३/२०२४**

---

१. जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदासाठीची ऑनलाईन परीक्षा दिनांक ०६/०८/२०२२, दिनांक ०९/०८/२०२२ व दिनांक १२/०८/२०२२ रोजी संपन्न झालेली आहे.

२. एकूण १५६ उमेदवारांची गुणानुक्रमे व आरक्षण प्रवर्गानुसार प्रतिक्षायादी व या प्रतिक्षायादी मधून ४९५ पैकी हजर न झालेल्या उमेदवारांऐवजी नियुक्तीसाठी प्रथम टप्प्यामध्ये ६७ उमेदवारांची शिफारस यादी (Recommended List) दिनांक २७/०२/२०२४ रोजी शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती तसेच सदर शिफारस यादी (Recommended List) शासनाला सादर करणेत आली होती. तसेच याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील, असेही नमूद करणेत आले होते.

३. शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४४/आ (तांत्रिक) दिनांक १३ मार्च २०२४ अन्वये श्री.वृषभ धनंजय भोरे (इतर मागासवर्ग - **सर्वसाधारण**) या उमेदवारास शासन सेवेतील नियुक्तीनुसार हजर होणेस मुदतवाढ देण्यात आल्याचे कळविले आहे. त्यामुळे इतर मागासवर्ग या प्रवर्गातील न्यूनतम गुण धारण करणारे गुणवत्ता क्र.३८१ वरील श्री.आदर्श सुभाषचंद्र पाटील यांची नियुक्तीसाठीची शिफारस रद्द करणेत येत आहे. परंतु उपरोक्त उमेदवार हे प्रतिक्षायादीमध्ये समाविष्ट राहतील.

४. ४९५ उमेदवारांचे मूळ शिफारस यादीमधील श्री.तृषभ रमेश मोटघरे (दिव्यांग प्रवर्ग-क) यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील वैद्यकीय मंडळाकडील अहवाल सादर केला करुन त्यांनी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावरील नियुक्तीसाठी इच्छुक असल्याचे कळविले आहे. त्यामुळे दिव्यांग प्रवर्ग-क या संवर्गातील प्रतिक्षायादीमधील श्री.प्रसन्ना प्रभू कट्टे यांची नियुक्तीसाठीची शिफारस रद्द करणेत येत आहे. परंतु उपरोक्त उमेदवार हे प्रतिक्षायादीमध्ये समाविष्ट राहतील.

५. प्रतिक्षायादीतील ६५ व मूळ यादीतील १ दिव्यांग उमेदवारांकरिता कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग नियमावलीनुसार विकल्प मागविणेबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे चालू आहे.

६. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा भरतीबाबत यापुढील इतर आवश्यक सूचना https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवळी प्रसिध्द करण्यात येतील. वरील संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**(वैशाली नारकर)**
**सदस्य सचिव**
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)
राज्यस्तरीय निवड समिती,
तथा अधीक्षक अभियंता व संचालक
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय,
पुणे

Scanned with OKEN Scanner